# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ४
## सभावृत्तांत

दिनांक : २१/८/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.२१/८/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.काळे - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

विषय क्रमांक :- ४) स्ट्रिटलाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक :- ५) ठराव रद्द करणेबाबत..
मा.सिध्देश्वर बारणे,मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ६) प्रभाग क्र.८९ येथे स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.. मा.सिध्देश्वर बारणे,मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ७) उपअभियंता पदोन्नती बाबत..मा.एकनाथ मोटे,मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ८) प्रभाग क्रमांक.७६ येथील रस्ते खडीकरण करणेबाबत..मा.वसंत लोंढे, मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ९) नदीकाठी सिमाभिंत बांधणेबाबत..मा.वसंत लोंढे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- १०) स्वच्छालय पैसे द्या व वापरा तत्वावर बांधणेबाबत.. मा.वसंत लोंढे , मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.उषा ढोरे          अनुमोदक : मा.लता खोमणे

सोमवार दिनांक २४/८/२००९ रोजी सकाळी १०.३० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

मा.सभापती :- सोमवार दि.२४/८/२००९ रोजी सकाळी १०:३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

------------------

(बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे )
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ४
सभावृत्तांत
(दिनांक २१/८/०९ ची तहकुब सभा)

दिनांक : २४/८/२००९ वेळ : सकाळी १०:३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक २१/८/२००९ ची तहकुब सभा सोमवार दि.२४/८/२००९ रोजी सकाळी १०.३० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
६. मा.खोमणे लता हनुमंत
७. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.देशमुख,मा.गायकवाड - सहा.आयुक्त,मा.काळे - नगरसचिव, मा.पवार - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दिनांक ७.८.०९ व ११.८.०९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- १३९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २४/०८/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/५५५/०९ दि.४.६.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पदोन्नती निवड समितीची शिफारस विचारात घेता १.डॉ.श्री.पोळ रमेश बाबुराव - खुला २.डॉ.श्री.कांबळे रमेश श्रीपती खुला(अनु.जाती)३.डॉ.श्रीमती.यादव कमल अजित (खुला),४.डॉ.श्री.इनामदार तृप्ती रत्नाकर (खुला) ५.डॉ.श्री.जेरे ध्रुव अनंत (खुला) ६.डॉ.श्री.मार्कंडेय प्रशांत अनंत (खुला) या वैद्यकिय अधिका-यांना जेष्ठ वैद्यकिय अधिकारी पदावर र.रु.१०००० - १५२०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १४० विषय क्रमांक :- २
दिनांक :- २४/०८/२००९ विभाग : झोनिपु
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/६/कावि/१९१/०९ दि.२०.६.०९
विषय :- कै.महेश गायकवाड यांचे वारसांना मदत करणेबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १४१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २४/०८/२००९ विभाग : झोनिपु
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- १) मा.तानाजी खाडे व मा.बाळासाहेब भुंबे यांचा प्रस्ताव..
२)मा.झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती सभा दिनांक २०.७.२००९, ठराव क्रमांक ६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील झोनिपु (स्था) विभागात श्री.डी.एन.गट्टुवार उपअभियंता पदावर काम करित आहेत. ते अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहेत तसेच त्यांची या पदावर तीन वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे. कार्यकारी अभियंता संवर्गातील अनुसूचित जमातीचे पद बरीच वर्षे रिक्त आहे व या संवर्गात श्री.गट्टुवार हे सर्वात जेष्ठ आहेत. श्री गट्टुवार यांचा झोनिपु (स्था) विभागातील १५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. या अनुभवाचा या विभागातील कामांचे नियोजन व कार्यवाहीसाठी मोठा उपयोग होणार आहे. सदर संवर्गातील उमेदवारांवर अन्याय होउ नये यासाठी श्री.गट्टुवार यांना निम्नस्तरावरील पदाच्या अनुभवाची अट शिथील करुन कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले</u> :-

ठराव क्रमांक :- १४२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २४.०८.२००९ विभाग :- विद्युत अ प्रभाग
सुचक :- मा.सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.एकनाथ मोटे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/वि/२६२/०९ दि.२१.०८.२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

अ प्रभागांतर्गत वॉर्ड क्र.४२ संभाजीनगर मधील स्ट्रिटलाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेकामी र.रु.४९,७५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १४३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २४.०८.२००९
सुचक :- मा. सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.सिध्देश्वर बारणे मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

वॉर्ड क्र.१५ चक्रपाणी वसाहत हा असुन दि.१५/५/०९ रोजी ठराव क्र. ६०९ मंजुर केलेला आहे. ज्यात वॉर्ड क्र.१५ च्या विकासासाठी ठरविलेली गुंतवणुक वॉर्ड क्र.१६ साठी वापरण्यासाठीचा निर्णय घेतलेला आहे. वॉर्ड क्र.१५ साठी ठरविलेली गुंतवणुक त्याच वॉर्डासाठी वापरणेत यावी. त्याकरिता ठराव क्र.६०९ दि.१५/५/०९ रद्द करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १४४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २४.०८.२००९
सुचक :- मा. सिध्देश्वर बारणे अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :- मा.सिध्देश्वर बारणे मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखडयातील ४५ मिटर रुंदीच्या रस्त्याचा विकास जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत करणेचे नियोजित असल्याने औंध वाकड रस्त्याचे कस्पटेवस्ती पासून वाकड पर्यंतच्या रस्त्याच्या कडेचे गटर्स दुरुस्ती करणे हे काम सदर रस्त्यास करणे शक्य नाही.

तरी सदरच्या कामाची आवश्यकता लक्षात घेता, औंध - वाकड रस्त्याचे कस्पटेवस्ती पासून वाकड पर्यंतच्या रस्त्याचे कडेचे गटर्स दुरुस्त करणे (नि.नो.क्र.२९/६३ - २००७/८) या कामामधुन प्रभाग क्र.८९ विशालनगर येथे ठिकठिकाणी गटर्स दुरुस्ती, पाईप्स चेंबर्स व पेव्हिंग ब्लॉक बसविणे इ. स्थापत्य विषयक कामे करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १४५ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २४.०८.२००९
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.सिध्देश्वर बारणे
संदर्भ :- मा.एकनाथ मोटे मा.सिध्देश्वर बारणे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर उपअभियंता (स्था) या अभिनामाची एकुण ५४ पदे शासन मंजुर आहेत. सदरील पदांपैकी माहे फेब्रुवारी २००९ मध्ये उपअभियंता (स्था) या अभिनामाच्या रिक्त झालेल्या व एक उपअभियंताचे कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती झाल्यानंतर रिक्त झालेल्या पदावर पदविकाधारक कनिष्ठ अभियंता १) श्री.महाजन किशोर सोपान २) श्री.बोत्रे बंडु बाबुराव यांना सेवाजेष्ठता नुसार उपअभियंता (स्था) या पदावर पदोन्नती र.रु.८००० - १३५०० या वेतनश्रेणी मध्ये नेमणुक

देणेत यावी. पिंपरी चिंचवड मनपाच्या आस्थापनेवर वैद्यकिय अधिकारी पदाचे उमेदवाराची दि.१०/८/०९ रोजी लेखी परीक्षा व दि.११/८/०९ रोजी तोंडी परीक्षा झालेली असून सदर वैद्यकिय अधिका-यांची निवड यादी तयार झालेली आहे. सदर निवड यादीमध्ये डॉ.छाया जयंत शिंदे बीएएमएस यांचे नाव नमुद केलेले आहे तरी विशेष बाब म्हणून महापालिका सभेच्या उमेद मान्यतेने सभावृत्तांताची वाट न पहाता डॉ.छाया जयंत शिंदे बीएएमएस यांची त्वरीत नेमणुक करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १४६ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २४.०८.२००९
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.वसंत लोंढे मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.७६ रहाटणी गावठाण येथे नागरीकांच्या सुरक्षिततेच्या व रहदारीच्या दृष्टीने रस्ते करणे (खडीकरण)आवश्यक असल्याने त्याकामीच्या र.रु. ४५,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १४७ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २४.०८.२००९
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.वसंत लोंढे मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.७६ रहाटणी गावठाण येथे पवनानदीकाठी नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सिमाभिंत बांधणे आवश्यक असल्याने त्याकामीच्या त्यास र.रु. ४५,५०,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या सायंस सेंटर इमारतीभोवती कंपाउंड वॉल बांधणे कामासाठी चिंचवड येथील आरक्षित जागेत र.रु.१९,२०,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक :- १४८ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २४.०८.२००९
सुचक :- मा.वसंत लोंढे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.वसंत लोंढे मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव..

प्रभाग क्र.७६ रहाटणी गावठाण येथील गंगानगर भागात नागरिकांच्या सोयीसाठी संडास ब्लॉक (२२ सिट्सचा) बांधणे आवश्यक असल्याने त्याकामीच्या र.रु. ३६,३८,८००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/७२०/०९

दिनांक- २५/०८/२००९ चे लगत

सही/-

नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.